# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | देवेंद्र पुंडलीकराव आरेकर, वय ४७ वर्ष, पद–कनिष्ठ सहाय्यक, नेमणूक : पंचायत समिती, अचलपूर, जि. अमरावती, वर्ग–३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २०.०५.२०१९ चे १४.५१ ते १५.०८ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २,०००/– रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | २,०००/– रुपये |
| ६ | घटनास्थळ | पंचायत समिती कार्यालय, अचलपूर, जि. अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे प्राथमिक शिक्षक असून त्यांनी दि.१७/०५/२०१९ रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दि.२०/०५/२०१९ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे श्री. आरेकर, कनिष्ठ सहाय्यक यांनी तक्रारदार यांचे सेवापुस्तीकेवर चटोपाध्याय व सहावा वेतन आयोग लागू केल्याबाबतचे नोंदीवर लेखाधिकारी जि.प. यांची सही (स्विकृती) घेण्यासाठी २०००/–रुपये लाचेची मागणी करुन २०००/–रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन दि.२०/०५/२०१९ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.आरेकर यांनी तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष २०००/–रु. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच त्यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र जेधे, नापोकॉ.श्री.अतुल टाकरखेडे, पोकॉ. श्री.पंकज बोरसे, श्री. शैलेश कडू, श्री.महेंद्र साखरे तसेच चालक ए.एस.आय. श्री.सतीश किटूकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :– अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ★ सत्यमेव जयते

(रविंद्र जेधे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned by CamScanner